E-1462371

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र - ३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

**प्रति,**
**शासकिय माहिती अधिकारी,**
**~~मा. अतिरिक्त आयुक्त सो.~~,**
**बाजार विभाग, मिरा-भाईंदर महानगर पालिका,**
**भाईंदर -प., ता.जि. ठाणे- ४०१ १०१**

१) **अर्जदाराचे नाव** :- **श्री. देविदास जयदेव किणी**
मो.नं. ९९६७९११४१७

२) **पत्ता** :- रा. एकविरा अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर -प., ता.जि. ठाणे -४०१ १०१

३) **आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल:-**
**(एक) माहितीचा विषय** :- बाजार लिलाव बाबतच्या निविदेबाबतची महिती मिळणेंबाबत...

**(दोन) माहितीशी संबंधित कालावधी** :- **सन २०२१ सालापासुन ते आजता गायत**

**(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :-**

१. बाजार लिलावाची निविदा दि. २५/०८/२०२३ रोजी संपली. काही मुदत वाढ दिली आहे का? मुदतवाढीसाठी निविदा दस्तऐवजा काही कलम आहे का? जर असेल तर किती कालावधी दिला आहे ? जर दिली नसेल तर मुदतवाढ कोणत्या आधारावर दिली जाते ?

२. कोणत्या दराने मुदत वाढ दिली गेली आहे? करार मूल्य का नाही वाढले? हे किती दिवस चालणार?

३. सध्याची मुदत संपण्यांच्या १ महिना अगोदर निविदा काढण्यांत आल्या पाहिजेत. करार म्हणजे दि. २५/०८/२०२३ गेल्या ६ महिन्यांपासुन निविदा का काढल्या नाहीत?

४. नविन निविदा रू. ४८,०९,६०,४९६/- हि ३ वर्षासाठी आहे म्हणजे रू. १६,०३,२०,१६५/- प्रति वर्ष विद्यमान करार @ रू. ७,४८,७०,४८३/- दर वर्षी तुम्ही २१४ % ने किमान बोली वाढवली आहे हे कशाच्या आधारावर गणना केली गेली आहे? बोली प्रक्रिया अयशस्वी झाल्यास सदर योजने बाबत तुमची कृती काय असेल? आचार संहिता लागण्याची शक्यता असल्याने यामागे तुमचा हेतु काय आहे? लवकरच अंमलबजावणी होईल. सदर बाबत होणारी शासकीय फी मी भरावयास तयार आहे.

**(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश: आवश्यक आहे किंवा कसे** :- **माहिती प्रत्यक्ष घेवुन जाणार.**

**(पाच) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन** :- **न्यायालयीन कामकाजाकरीता**

**(सहा) अर्जदार दारीद्रय रेषेखालील आहे किंवा नाही** :- **नाही.**

**ठिकाण :- भाईंदर**
**दिनांक :-** १३/०२/२०२४

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**श्री. देविदास जयदेव किणी**

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र.मनपा/ बाजार/98/2023-24 दि.23/02/2024

OK

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

प्रति,

**श्री. देवीदास जयदेव किणी,**
एकविरा अपार्टमेंट, राम मंदिर रोड,
भाईंदर (प.).

**विषय :- माहिनीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.**
**बाजार लिलाव बाबतच्या निविदेबाबतची माहिती मिळणे बाबत.**
**संदर्भ :- आपला दि. 14-02-2024 रोजीचा माहिती अधिकारातील प्राप्त अर्ज.**

उपरोक्त विषयान्वये या विभागाकडे माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला संदर्भिय अर्ज प्राप्त झालेला झालेले असुन त्यातील अपेक्षिलेली मुद्देनिहाय माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1. | बाजार लिलावाची निविदा दि. 25-08-2023 रोजी संपली. काही मुदत वाढ दिली आहे का? मुदतवाढीसाठी निविदा दस्ताऐवजा काही कलम आहे का? जर असेल तर किती कालावधी दिला आहे? जर दिली नसेल तर मुदतवाढ कोणत्या आधारावर दिली जाते? | मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी दि. 07-08-2023 रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र. 195 मध्ये नमूद केल्या प्रामणे निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालु असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देण्याचे नमूद आहे. महानगरपालिकेच्या बाजार विभागाने चालु केलेल्या बाजार फी वसुलीची निविदा प्रक्रियेस प्रतिसाद प्राप्त झाल्यास मंजूर केलेल्या नविन दरानुसार बाजार फी वसुली करण्याचे निश्चित केले असल्याने मागील ठेकेदार मागील दरानुसारच वसुली करून मनपा फंडात नियमित भरणा करीत आहे. नविन निविदेस प्रतिसाद प्राप्त झाल्यास चालु असलेला ठेका अपोआप रद्द होईल. |
| 2. | कोणत्या दराने मुदतवाढ दिली गेली आहे? करार मुल्य का नाही वाढले? हे किती दिवस चालणार? | संबंधित ठेकेदार मागील दराने बाजार फी वसुली करीत असुन निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर नविन दराची अंमलबजावणी होईल. |
| 3. | सध्याची मुदत संपण्याच्या 1 महिना अगोदर निविदा काढण्यांत आल्या पाहिजेत. करार म्हणजे दि. 25-08-2023 गेल्या 6 महिन्यांपासुन निविदा का काढल्या नाहीत? | सदरची निविदा दि. 25-01-2024 रोजी काढण्यात आली असुन त्यास प्रतिसाद प्राप्त न झाल्याने पुन्हा निविदा प्रक्रिया करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| 4. | नविन निविदा रू. 48,09,60,496/- ही 3 वर्षासाठी आहे म्हणजे रू. 16,03,20,165/- प्रति वर्ष विद्यमान करार @ रू. 7,48,70,483/- दर वर्षी तुम्ही 214% ने किमान बोली वाढवली आहे हे कशाच्या आधारावर गणना केली गेली आहे? बोली प्रक्रिया अशस्वी झाल्यास सदर योजने बाबत तुमची कृती काय असेल? आचार संहिता लागण्याची शक्यता असल्याने यामागे तुमचा हेतु काय आहे? लवकरच अंमलबजावणी होईल. | सदरची माहिती ही प्रश्नार्थक असल्याने माहिती आपण विभागातुन संकलित करावी. |

तसेच देण्यात येत असलेल्या माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त (बाजार विभाग) तिसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात आपणास अपिल करता येईल.

23/2/2024

(संजय दोंदे)
सहा.आयुक्त तथा जनमाहिती अधिकारी
(बाजार विभाग)
मिरा भाईंदर महानरपालिका

बाजार विभाग

# मिरा भाईदर महानगरपालेका

प्रशासकीय ठराव दिनांक ७/८/2023 रोजी ४.३० वाजता

प्रकरण क्र. (९६५) : सन 2023-24 या आर्थिक वर्षातील बाजार फी वसुलीच्या ठेक्याबाबत.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मा. आयुक्त सो. यांचे समवेत दि. 01-08-2023 रोजी झालेल्या चर्चेनुसार बाजार विभागाने सादर केलेल्या सन 2023-24 या आर्थिक वर्षात बाजार फी वसुली करणेकामी ठेकेदार नियुक्त करण्याच्या निविदेबाबत चर्चा केली असता सदर चर्चेमध्ये प्रती वर्षी 10% वाढ करणे ऐवजी प्रती वर्ष 20% वाढ करणेबाबत सर्वांचे एकमत झाले. तसेच यापुर्वी असलेल्या प्रती फेरीवाला बाजार फी वसुली पावतीच्या नमुद रक्कमेत रू. 25/- ने वाढ करणेबाबतही चर्चेमध्ये निर्णय घेण्यात आला.

तरी याप्रमाणे प्रती वर्षी ठेका न देता सलग तीन वर्षाकरीता ठेका देणे उचित होणार असल्याने त्या अनुषंगाने धोरण निश्चित करणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी प्रत्येक वर्षाच्या निर्धारीत केलेल्या रक्कमेवर प्रती वर्षी 20% वाढ करून सलग तीन वर्षाकरीता बाजार फी वसुली ठेक्याची माहिती तसेच बाजार फी पावतीच्या रक्कमेत रू. 25/- प्रमाणे वाढ करून होणारी माहिती खालील प्रमाणे आहे.

| | अ.क्र. | विभाग | सन | निर्धारीत रक्कम | 20% वाढ करून होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ | 1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र | 2023-24 | 7,48,70,483/- | 8,,98,44,580/- |
| | 2 | | 2024-25 | 8,,98,44,580/- | 10,78,13,496/- |
| | 3 | | 2025-26 | 10,78,13,496/- | 12,93,76,195/- |

| ब | अ.क्र. | पूर्वीची पावती फी रू. | GST (18%) | एकूण | वाढीव प्रमाणे पावती फी रू. | GST (18%) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 50 | 9 | 59 | 75 | 14 | 89 |
| | 2 | 75 | 14 | 89 | 100 | 18 | 118 |

तरी वरील प्रमाणे प्रत्येक वर्षाच्या बाजार फी वसुली करीता निर्धारीत केलेल्या रक्कमेवर प्रती वर्षी 20% वाढ, बाजार फी पावतीच्या रक्कमेत रू. 25/- ने वाढ व सलग तीन वर्षाच्या कालावधीकरीता निविदा काढणे तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालु असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देणे इत्यादी बाबत मा. महासभेच्या/ प्रशासक यांचे मान्यतेने प्रशासकिय ठरावाद्वारे मान्यता देणेस शिफारस आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ९६५ दिनंक ७/८/2023**

प्रत्येक वर्षाच्या बाजार फी वसुली करीता निर्धारीत केलेल्या रक्कमेवर प्रती वर्षी 20% वाढ, बाजार फी पावतीच्या रक्कमेत रू. 25/- ने वाढ व सलग तीन वर्षाच्या कालावधीकरीता निविदा काढणे इत्यादी बाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

वरील प्रमाणे प्रत्येक वर्षाच्या बाजार फी वसुली करीता निर्धारीत केलेल्या रक्कमेवर प्रती वर्षी 20% वाढ, बाजार फी पावतीच्या रक्कमेत रू. 25/- ने वाढ व सलग तीन वर्षाच्या कालावधीकरीता निविदा काढणे तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालु असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देणे इत्यादी बाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

वरील निर्णयाची नियमानुसार संबंधित विभागाने अंमलबजावणी करावी.

(वासुदेव शिरवळकर)

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त